# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com

Web Site : rdtenagpur.org.in फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

कार्यालयीन आदेश :

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–२/अभ्यासक्रम/२०१३/1099

दि. 12 APR 2013

विषय :– **शैक्षणिक वर्ष २०१३–१४ करीता मंजूर अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ, प्रवेश क्षमतेत वाढ–घट, अभ्यासक्रम बंद, नवीन अभ्यासक्रम इ.बाबत.**

संदर्भ :– **मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/ मान्यता/तपासणी/ २०१३/२२४, दि. १० एप्रिल २०१३.**

संचालनालयाच्या अधिसुचनेनुसार या विभागांतर्गत सुरू असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१३–१४ करीता मंजूर अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ, प्रवेश क्षमतेत वाढ–घट, अभ्यासक्रम बंद, नवीन अभ्यासक्रम इ.बाबत दि. १०.०४.२०१३ पर्यंत मान्यता देण्यांत येणार आहेत. तरी आपणांस कळविण्यांत येते की, आपणांस परिषदेकडून प्राप्त होणा–या मान्यतेस अनुसरून संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड व्दारे संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉगइन करून आपणास परिषदेने दिलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ–घट व इतर माहिती दि. १२.०४.२०१३ पर्यंत अद्ययावत करावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०१३–१४ ची प्रवेश प्रक्रिया व तदअनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या माहितीचा विचार होणार नसल्याने याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीश: लक्ष घालून आपल्या संस्थेनी अद्ययावत केलेली माहिती व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शासनास उपलब्ध करून दिलेली माहिती याची पडताळणी तथा तपासणी या कार्यालयामार्फत करावयाची आहे.

सदरहू प्रस्तावाच्या तपासणीचे कामाकरीता निम्नदर्शित अधिका–यांची नियुक्ती करण्यांत येत आहे.

**१) श्री ए.पी. वाघमारे, अधिव्याख्याता उपयोजित यंत्रशास्त्र, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर.**

**२) सौ. एम.एन. बावणे, अधिव्याख्याता, अणुविद्युत, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर**

याकरीता या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा–या संस्थांनी त्यांचे उपरोक्त शैक्षणिक वर्ष २०१३–१४ चे प्रस्ताव संचालनालयाचे संकेतस्थळी माहिती अद्ययावत केलेल्या माहितीची छाननी तथा तपासणी या कार्यालयामार्फत दिनांक **१२.०४.२०१३ व १३.०४.२०१३** रोजी करण्यांत येणार असल्याने संबंधित संस्थांनी संचालनालयाचे संकेतस्थळी भरलेल्या अद्ययावत व अचूक माहितीच्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्रासह **(२ संचासह)** उपरोक्त दिनांकास या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली माहिती अचूक असल्याची तपासणी करून घ्यावी. (जसे–एआयसीटीई ची मान्यता, संचालनालयाची मान्यता, प्रस्तावाच्या ए,बी,सी, प्रपत्राच्या प्रती)

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत : १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सादर.
२) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
३) संबंधित अधिका–यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता (प्राचार्यामार्फत)
४) सर्व संबंधित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट पदविका संस्था यांना माहिती व तात्काळ आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dte.org.in


**अधिसूचना**

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/तपासणी/२०१३/२२४

दिनांक : १०.४.२०१३

राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. **पदविका** या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता मंजूर अभ्यासक्रमांच्या मान्यतेस मुदतावाढ, प्रवेशक्षमतेत वाढ-घट, अभ्यासक्रम बंद, नवीन अभ्यासक्रम इ. बाबत दि. १०.४.२०१३ पर्यंत मान्यता देण्यात येणार आहेत. याबाबत सर्व संबंधीत व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून प्राप्त होणाऱ्या मान्यतेस अनुसरुन त्यांनी या संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड व्दारे संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉग-इन करुन संस्थेस परिषदेने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील वाढ-घट व इतर माहिती दि. १२.४.२०१३ पर्यंत अद्ययावत करावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची प्रवेश प्रक्रिया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने सदर दिनांकानंतर प्राप्त झालेल्या माहितीचा विचार होणार नसल्याने याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी व्यक्तीशः लक्ष घालून माहिती अद्यायावत करावी.

येथे असेही सूचित करण्यात येते की, संचालनालयाच्या संकेतस्थळी माहिती अद्यायावत केलेल्या माहितीची छाननी तथा तपासणी सहसंचालक, विभागीय कार्यालये यांचेमार्फत करण्यात येईल. म्हणून संबंधित संस्था प्रमुखांनी त्यांची संचालनालयाच्या संकेतस्थळी भरलेली माहितीच्या अनुषंगाने आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयात त्यांनी दिलेल्या दिनांकास प्रत्यक्ष उपस्थित राहून उपलब्ध करुन देवून संबंधित कागदपत्रांचा १ संच त्यांचेकडे जमा करण्यात यावा.

**sd/-**

**(डॉ. सुभाष महाजन)**

प्र.संचालक,

तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील **पदविका** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी अद्ययावत केलेली माहिती व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेली माहिती यांची पडताळणी तथा तपासणी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करुन दि. १४.४.२०१३ पर्यंत माहितीची तपासणी करण्यात यावी. तसेच तपासणीत काही त्रुटी तथा तफावत आढळल्यास आपण संचालनालयाच्या संकेतस्थळी लॉग-इन करुन माहितीची दूरुस्ती संबंधित संस्थेकडून करुन घ्यावी. सदर माहितीच्या आधारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठीची शासन मान्यता, प्रवेश प्रक्रिया व तद्अनुषंगिक कार्यवाही होणार असल्याने त्यात काही त्रुटी उद्भवल्यास आपणांस जबाबदार धरण्यांत येईल, याची आपण नोंद घ्यावी.

२. सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३, तंत्र शिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई

त्यांना कळविण्यात येते की, सदर अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात यावी.